पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address:** SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

*दिनांक- ०५/१२/२०१९*

## अल्पवयीन मुलीचा विनयभंग करणाऱ्या आरोपीस ५ वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा तसेच २६,०००/- रुपये दंड

=> विशेष सत्र न्यायाधिश, गडचिरोली श्री. आर.एन. मेहरे यांचा न्यायनिर्णय

दिनांक १८/०८/२०१८ रोजी दुपारी १४:०० वा. पिडीत मुलगी ही एकटी आपल्या घरी दुकानात हजर असतांना आरोपी नामे गौतम मनोज भैसारे हा खर्रा खान्याचे बहान्याने तिचे दुकानात जावुन पिडीत मुलगी ही खर्राचे पैसे ठेवण्याकरीता घरात गेली असता आरोपी तिच्या पाठीमागे बळजबरीने पिडीत मुलीच्या घरात घुसुन तिला जबरदस्तीने पलंगावर पाडुन तिच्या विनयभंग करुन तिला लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करतेवेळी पिडीताने आरोपीला जोरात बाजुला ढकलुन ती घराबाहेर निघाली. तेव्हा आरोपीने तेथुन पळ काढला. त्यानंतर पिडीत मुलीचे आई घरी आल्यानंतर पिडीतेने घडलेली संपुर्ण घटना आपली आईस सांगीतली. पिडीतेच्या आईने पोस्टे गडचिरोली येथे सदर घटनेबाबतचा तक्रार दिली.

पोलीस स्टेशन अधिकारी यांनी अप.क्र. ३४४/२०१८ कलम ३५४, ४४८ भादवी तसेच कलम ८ बा.लै.अ.प्र. कायदा अन्वये गुन्हा नोंद करुन तपासी अधिकारी मपोउपनि तेजस्वी पाटील, पोस्टे गडचिरोली यांनी आरोपीस अटक करुन सदर गुन्ह्याचा केली. आरोपीविरोधात सबळ पुरावा मिळाल्याने दोषारोपपत्र तयार करुन मा. न्यायालयात दाखल केले. मा. विशेष सत्र न्यायाधीश गडचिरोली यांनी साक्ष पुरावा तसेच जिल्हा सरकारी वकील श्री. अनिल प्रधान यांच्या युक्तिवाद ग्राह्य धरुन आज दिनांक ०५/१२/२०१९ रोजी आरोपी गौतम मोनाजी भैसारे, वय ३३ वर्ष रा. साखरा ता.जि. गडचिरोली याला दोषी ठरवुन कलम ८ बा.लै.अ.प्र. कायदा व कलम ४४८ भादवी अन्वये ५ वर्षे सक्षम कारावास व २६,०००/- रुपये दंडाची शिक्षा ठोठावली आहे. तसेच या रक्कमेतुन रुपये २०,०००/- पिडीतेला भरपाई म्हणुन देण्याचे आदेश पारीत केले आहे.

सदर प्रकरणात कोर्ट पैरवी अधिकारी म्हणुन पोनि श्री. प्रकाश तुनकलवार यांनी कामकाज पाहीले आहे.